**सत्र खटला क्र. ४६/२०२४ मधील फौजदारी जामीन अर्ज**
**महाराष्ट्र शासन वि. संदीप उर्फ बाबुराव सुभाष शेवाळे व इतर**
(CNR NO. MHBU20-000700-2024)

## नि.क्र. १०९ खाली आदेश
**(पारीत दिनांक १५ एप्रिल २०२६)**

०१]    अर्जदार **– महादेव उर्फ देवा दत्तात्रय माळवे** याने भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ४८३ अन्वये पोलीस ठाणे, जानेफळ येथील अपराध क्र. २०४/२०२४, कलम ३६४, ३६५, १२०(ब), ३०२ सह कलम ३४ भा.दं.वि. खालील प्रकरणात नियमित जामीन मिळण्यासाठी प्रस्तुत अर्ज दाखल केला.

०२]    अभियोग पक्षाच्या कथेनुसार फिर्यादीचे पती दिलीप इंगळे हे पैशाचा पाऊस पाडत होते. त्यामुळे दिलीप इंगळे आणि अमोल राजपुत यांचे मध्ये काही दिवसांपासून पैशाच्या व्यवहारावरून वाद चालू होता. म्हणून आरोपी अमोल राजपुत याने कट रचून, पूर्व नियोजन करून दिनांक २२.०६.२०२४ रोजी दुपारी ०३.०० वाजताच्या सुमारास संदीप उर्फ बाबुराव शेवाळे, योगेश तोंडे, शेख साजिद शेख अजीस यांच्या मदतीने संदीप दातार याची स्वीफ्ट गाडी क्र. एम.एच.–०३–बी.एच. १८२४ या वाहनात फिर्यादीच्या पतीला घातपात करण्याच्या उद्देशाने किंवा जिवे मारण्याच्या उद्देशाने जानेफळ येथून कोपरगाव, जि. अहमदनगर येथे नेले. त्यानंतर या आरोपींनी इतर अज्ञात इसमाच्या सहाय्याने फिर्यादीच्या पतीचे अपहरण घडवून आणल्याचे जबाबात सांगितले. फिर्यादी हिने पोलीस ठाणे, कोपरगाव, जि. अहमदनगर येथे फिर्याद दाखल केली. सदर फिर्याद पोलीस ठाणे, जानेफळ येथे ऑनलाईन पाठवण्यात आली. तपासादरम्यान फिर्यादीच्या पतीची निर्घृण हत्या करण्यात आली असल्याचे निष्पंन्न झाले. त्यामुळे पोलीस ठाणे, जानेफळ येथे अपराध क्र. २०४/२०२४ कलम ३६४,३६५,१२०(ब), ३०२ सह कलम ३४ भा.दं.वि. खाली गुन्हा नोंदवण्यात आला.

०३]    अर्जदाराच्या वतीने विद्वान विधिज्ञ श्री. दिलदार खान यांनी युक्तिवाद केला की, अर्जदार हा निर्दोष असून त्याचा या गुन्ह्याशी कोणताही संबंध नाही. आरोपी बाबु नाळे

याने पोलिसांसमोर दिलेल्या कबुली जबाबाच्या आधारावर अर्जदाराला या खोट्या गुन्ह्यात गोवण्यात आले आहे. पोलिसांसमोरील बयाण अदखलपात्र आहे. अर्जदाराकडून काहीही जप्त करण्यात आलेले नाही. पोलिसांसमोरील कबुली जबाबाव्यतिरिक्त अर्जदाराविरूद्ध कोणताही कायदेशीर पुरावा दोषारोपपत्रात दाखल करण्यात आला नाही. अर्जदाराचे नाव फिर्यादीत नमूद नाही व साक्षीदारांच्या बयाणात देखील आलेले नाही. अर्जदाराकडून काहीही जप्त करण्यात आलेले नाही. अर्जदार हा घटनास्थळावर हजर होता याचा उल्लेख पूर्ण दोषारोपपत्रात कुठेही आलेला नाही. घटना ही दिनांक २२.०६.२०२४ रोजी घडल्याचे अभिलेखावरून दिसून येते. फिर्यादीचे पती आरोपी संदीप याच्यासोबत गेले असल्याचे तिला पहिल्याच दिवशी माहित होते. परंतु दिनांक ०९.०७.२०२४ रोजी आरोपी संदीप याच्या सांगण्यावरून फिर्यादीने उशिरा फिर्याद दाखल केली. अर्जदाराचा मयत दिलीप इंगळे याची हत्या करण्याचा कोणताही पूर्व नियोजित हेतू नव्हता. दुसऱ्याने केलेल्या गुन्ह्यात अर्जदाराला फसवण्यात आले आहे. केवळ फोन कॉलच्या आधारे व कबुली जबाबाच्या आधारे अर्जदारावर आरोप ठेवण्यात आले आहे.

०४] अर्जदारातर्फे पुढे युक्तिवाद करण्यात आला की, अर्जदाराने षडयंत्र कधी व कोठे केले याबाबतचा पुरावा नाही. पूर्ण प्रकरण परिस्थितीजन्य पुराव्यावर आधारीत आहे. परंतु अर्जदाराला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष या गुन्ह्याशी जोडणारा कोणताही पुरावा अभिलेखावर नाही. या प्रकरणातील दोन आरोपी माननीय सर्वोच्च न्यायालय व माननीय उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी जमानतीवर सोडलेले आहे. त्या आरोपींच्या कृत्याच्या तुलनेत अर्जदाराचे प्रत्यक्ष कोणतेही कृत्य नाही. त्यामुळे अर्जदार समन्याय तत्वाच्या आधारे जमानत मिळवण्यास पात्र आहे. अर्जदाराची कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही. अर्जदाराला जामीन मिळाल्यास तो जामीन आदेशावरील कोणत्याही अटी व शर्तींचे पालन करण्यास तयार आहे. म्हणून अर्जदाराला जामीन देण्यात यावा अशी विनंती करण्यात आली. अर्जदाराच्या वतीने खालील न्यायनिवाड्यांवर भीस्त ठेवण्यात आली.

[01] **Mohammad Asgar Abdul Jabbar Ansari Vs. State of Maharashtra, reported in 2004 ALL MR (Cri) 646.**

[02] **Vasudev Nakul Ozarekar Vs. The State of Goa,** reported in **2025 ALL MR (Cr) 4498.**

[03] **Jagdish Anil Devkar Vs. State of Maharashtra in Criminal Application (BA) No. 1184/2025, decided on 24.03.2026.**

[04] **Praful Shankar Satghare Vs. The State of Maharashtra,** reported in **2024 ALL MR (Cri) 3600.**

[05] **Bhushan Vs. The State of Maharashtra, in Criminal Appal arising out of SLP (Crl) No(S). 13740 of 2025, decided on 14.11.2025.**

[06] **Suraj s/o Dadaso Zende Vs. The State of Maharashtra, in Criminal Application (BA) No. 1183/2025, decided on 18.12.2025**

०५] याउलट, विद्वान सरकारी वकील श्री. पी. टी. लाहुडकर यांनी तपासी अंमलदाराच्या म्हणण्यावर जोर देऊन जामीन अर्जावर प्रखर आक्षेप घेतला. त्यांनी युक्तिवाद केला की, प्रस्तुत प्रकरण हे अपहरण आणि हत्येचे असून परिस्थितीजन्य पुराव्यावर आधारीत आहे. मयत दिलीप इंगळे हा आरोपी अमोलच्या मदतीने पैशाचा पाऊस पाडत असल्याचा त्याच्यावर आरोप आहे. आरोपी अमोल व अर्जदार यांच्या सी.डी.आर. मध्ये घटनेच्या दिवशीचे संभाषण आहे. या प्रकरणात मोबाईल आणि बोलेरो जीप जप्त होणे बाकी आहे. अर्जदाराचा या गुन्ह्यात सहभाग आहे. तसेच या गुन्ह्यात इतर अज्ञात आरोपींचा देखील समावेश आहे. त्यामुळे अर्जदार साक्षीदारांना फितूर करू शकतो व न्यायापासून पलायन देखील करू शकतो. म्हणून अर्जदाराचा जामीन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

०६] दोन्ही पक्षाच्या युक्तिवादाच्या अनुषंगाने दोषारोपपत्रातील केस पेपर आणि अर्जदाराने दाखल केलेले प्रकाशित न्यायनिवाडे यांची पाहणी करण्यात आली. येथे महत्त्वपूर्ण बाब नमूद करणे असे की, प्रस्तुत प्रकरण हे परिस्थिती जन्य पुराव्यावर आधारित असल्याने या प्रकरणात प्रत्यक्षदर्शी पुरावा मिळणे अपेक्षित नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांसमोरील जबाब अदखल पात्र आहे. परंतु या प्रकरणात मुख्य आरोप अमोल राजपुत याने दिलीप इंगळे यांची हत्या करण्याकरिता अर्जदाराला फोनवर सांगितले होते. त्यासंबंधातील सी.डी.आर. आणि एस.डी.आर. उपलब्ध आहेत. सी.डी.आर.आणि एस.डी.आर. दखलपात्र पुरावा आहे व त्याची पुष्टी मुख्य आरोपी बाबु नाळे करत आहे. त्यामुळे अर्जदाराचा या गुन्ह्याशी संबंध जुळत आहे.

०७] सी.डी.आर. व एस.डी.आर. नुसार अर्जदाराचा या गुन्ह्याशी संबंध आहे. प्रस्तुत प्रकरण हे अपहरण आणि हत्या करण्याचे असल्याने गुन्ह्याचे स्वरूप अत्यंत गंभीर आहे. या प्रकरणातील मयत दिलीप इंगळे याची पाईपाच्या सहाय्याने निर्घृण हत्या करण्यात आली आहे. हत्येकरिता षडयंत्र रचण्यात येऊन बऱ्याच आरोपींची मदत घेण्यात आली आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरण हे अतीशय गंभीर स्वरूपाचे अपहरण करून, कटकारस्थान रचून हत्या करण्याचे आहे. प्रस्तुत गुन्ह्यात मोबाईल आणि गुन्ह्यात हत्या करण्यासाठी वापरलेले बोलेरो वाहन जप्त करणे बाकी आहे. या गुन्ह्यात अनेक अज्ञात इसमांचा सहभाग आहे. त्यामुळे इतर अज्ञात व्यक्तींची चौकशी, गुन्ह्यात सहभागी असलेल्या आरोपींची माहिती, गुन्ह्यात वापरलेले बोलेरो वाहन आणि मोबाईल जप्ती कामी अर्जदाराच्या कोठडीची आवश्यकता भासणार आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणातील तथ्य व परिस्थिती व अर्जदाराने भरोसा ठेवलेले प्रकाशित न्यायानिवाड्यातील तथ्य परिस्थिती यामध्ये फरक आहे. म्हणून अर्जदाराला प्रकाशित न्यायनिवाड्यांचा लाभ होत नाही.

०८] या प्रकरणात दोषारोपपत्र दाखल झाले असले तरीही अर्जदाराविरूद्ध नोंद असलेल्या गुन्ह्यात मृत्यूदंडाची तरतूद आहे. अर्जदाराला जामीन मिळाल्यास तो तपासात सहकार्य करणार नाही. याउलट अर्जदार साक्षीदारांवर दबाव आणून त्यांना फितूर करण्याची शक्यता नाकारता येत नाही. अर्जदार हा बाहेर जिल्ह्यातील रहिवासी असल्याने न्यायापासून पलायन करण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. म्हणून गुन्ह्याचे स्वरूप, गंभीरता, गुन्ह्यासाठी असलेली शिक्षेची तरतूद, अर्जदाराचे कृत्य आणि तपासाची स्थिती पाहता अर्जदाराचा जामीन अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. करिता पुढील आदेश पारित करण्यात येतो.

## – आ दे श –

नियमित जामीन अर्ज (नि.क्र. १०९) नामंजूर करण्यात येतो.

(आदेश खुल्या न्यायालयात लिखित व घोषित)

SAGAR KRISHNARAOJI MUNGILWAR
Digitally signed by SAGAR KRISHNARAOJI MUNGILWAR
Date: 2026.04.15 15:55:53 +0530

**(सागर कृ मुंगीलवार)**
**अतिरिक्त सत्र न्यायाधीश**
**मेहकर**

**दिनांक – १५.०४.२०२६**
**ठिकाण – मेहकर**

मी, खात्रीपूर्वक असे कथन करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील आदेशाचा/न्यायनिर्णयाचा संपूर्ण मजकूर हा मूळ आदेशाप्रमाणे /न्यायनिर्णयाप्रमाणे  शब्दशः, तंतोतंत व बरोबर आहे.

न्यायालयाचे नांव – श्री. सागर कृ मुंगीलवार,
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, मेहकर.

लघुलेखकाचे नांव – शेख इम्रान अब्दुल रऊफ,
लघुलेखक ग्रेड – १, मेहकर

दिनांक – १५.०४.२०२६